केंद्र प्रमुखांची रिक्त पदे सरळसेवेने व मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याकरिता स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम निश्चित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांक :- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१६३/टीएनटी-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०९ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पीआरई-१०९४/७०४/(एक)प्राशि-१, दिनांक १४ सप्टेंबर, १९९४
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पीआरई-२००५/४४६०/प्राशि-१, दिनांक २ फेब्रुवारी, २०१०
३) शासन अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.सेवाप्र-२०१३/प्र.क्र.१०६ आस्था-९, दिनांक १० जुन, २०१४.
४) शासन निर्णय, समक्रमांक, दि. १६ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना</u> :-

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि साक्षरता या अभियानांसबंधी गठीत केलेल्या कार्यबल गटाच्या शिफारशीनुसार, जिल्हा परिषदांतील प्राथमिक शाळांमध्ये सर्वांसाठी शिक्षणाचे सुक्ष्म नियोजन, सतत उपस्थिती टिकविणे व शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरीता एकुण ४८६० केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. त्यानुषंगाने जिल्हा परिषदेच्या १० प्राथमिक शाळांकरीता एक या प्रमाणात केंद्र प्रमुखांचे प्रत्येकी एक पद निर्माण करण्यात आले.

संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन अधिसूचनेनुसार केंद्र प्रमुखांच्या पदभरतीकरीता सेवाप्रवेश नियम निश्चित करण्यात आले. त्यानुसार केंद्र प्रमुखांच्या एकुण पदांपैकी मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे तसेच स्पर्धात्मक परीक्षेद्वारे सरळसेवेचे अनुक्रमे ३० टक्के व ४० टक्के पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुषंगाने केंद्र प्रमुखांची रिक्त पदे स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती संदर्भाधीन क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. तथापि, सदर परीक्षेचा अभ्यासक्रम केंद्रप्रमुखांच्या कर्तव्याशी सुसंगत नाही तसेच संक्षिप्त व परिपुर्ण नसल्यामुळे सदर अभ्यासक्रम नव्याने निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुध्दिपत्रक :-

केंद्र प्रमुखांची पदे स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्याबाबत शासन निर्णय, दि.१६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ वगळण्यात येत असून खालीलप्रमाणे परिच्छेद क्र. ५ अंतर्भूत करण्यात येत आहे :-

"**५. परीक्षेचे माध्यम व अभ्यासक्रम -** परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी राहील. उमेदवारांना यापैकी एक माध्यम निवडावे लागेल. परीक्षा एकूण २०० गुणांची असेल. परीक्षेसाठी पुढीलप्रमाणे घटक व गुणांकन राहील.

पेपर क्र.	घटक	उपघटक	प्रश्नसंख्या	गुण
१	**बुध्दिमत्ता व अभियोग्यता**	अभियोग्यता - गणितीय चाचणी तार्किक क्षमता, वेग आणि अचूकता, भाषिक क्षमता इंग्रजी, भाषिक क्षमता मराठी, अवकाशीय क्षमता, कल, आवड, समायोजन आणि व्यक्तिमत्व इ. बुध्दिमत्ता- आकलन, वर्गीकरण, समसंबंध, क्रमश्रेणी, तर्क व अनुमान, कूटप्रश्न, सांकेतिक भाषा, लयबध्द मांडणी इ.	१००	१००
२	**शालेय शिक्षणातील नियम, अधिनियम व शैक्षणिक नवविचार प्रवाह**	भारतीय राज्यघटनेतील शिक्षणविषयक तरतूदी, संबंधित सर्व कायदे योजना व अद्ययावत शासन निर्णय	१०	१०
		शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख संस्था/संघटन व त्यांचे कार्य	१०	१०
		माहिती तंत्रज्ञान वापर (प्रात्यक्षिक)	१५	१५
		अभ्यासक्रम व मूल्यमापन, अध्ययन अध्यापन पध्दती	१५	१५
		माहितीचे विश्लेषण व मूल्यमापन	२०	२०
		विषयनिहाय आशयज्ञान आणि सामान्यज्ञान, विशेषकरुन इंग्रजी विषयज्ञान	१५	१५
		संप्रेषण कौशल्य (समज संपर्क साधने)	१५	१५
		एकुण	१००	१००
		एकूण	**२००**	**२००**

अनुक्रमांक २ मधील उपघटकांचे स्वरुप :-

उपघटक १ : भारतीय राज्यघटनेतील शिक्षण विषयक तरतूदी, बालकांशी संबंधित सर्व कायदे, योजना व अद्ययावत शासन निर्णय

अ) भारतीय राज्यघटनेतील शिक्षण विषयक तरतूदींची (कलमांची) माहिती (अद्ययावत दुरुस्त्यांसह)

ब) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व सदर अधिनियमातील महाराष्ट्र राज्य नियमावली २०११ (अद्ययावत दुरुस्त्यांसह) विश्लेषण : बलस्थाने व अडचणी

क) बाल हक्क संरक्षण कायदा २००५ - बाल संरक्षण आणि सुरक्षा - चालू भय आणि चिंता

ड) विद्यार्थी लाभाच्या विविध योजना (केंद्र व राज्य शासन) व शिष्यवृत्ती

इ) विशेष गरजा असणाऱ्या व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विविध योजना

उपघटक २ : शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख संस्था/संघटन व त्यांचे कार्य

UNICEF, NCERT,NUEPA,NCTE, CCRT, TISS,TIFR, Homi Bhabha Center of Science Education, RTE, EFLU, MPSP, MSCERT, MIEPA, SISI, DIECPD, राज्य आंग्लभाषा इ.

उपघटक ३ : माहिती तंत्रज्ञानाचा वापर (प्रात्यक्षिक)

अ) इंटरनेटचा प्रभावी वापर

ब) शाळास्तरावर विविध माहिती भरणे

क) शासनाच्या उपलब्ध Portal वरील माहिती वापरासंबंधीचे ज्ञान (SARAL, U-DISE)

ड) संगणक वापराविषयीचे ज्ञान

इ) माहितीचे विश्लेषण

फ) शाळास्तरावरील अंदाजपत्रक व हिशोब

उपघटक ४ : अभ्यासक्रम व मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन पध्दती

अ) पूर्व प्राथमिक ते बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम

ब) अध्ययन निष्पतीतील उणीवा

क) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व पूरक मार्गदर्शन

ड) प्रश्न निर्मिती (स्वाध्याय) कौशल्य : ASER, NAS, PISA

इ) प्रगत अध्यन-अध्यापन शास्त्र

फ) निकालासंबंधीची कामे

उपघटक ५ : माहितीचे विश्लेषण मूल्यमापन

अ) प्राप्त माहितीचे विश्लेषण

ब) शासनाच्या विविध पोर्टलवरील माहितीचे विश्लेषण करता येणे

क) ASER, NAS, PSM चाचण्या, शाळांचे निकाल यामाहितीचे विश्लेषण करता येणे.

ड) संप्रेषण कौशल्य : समाज संपर्काची विविध साधने

उपघटक ६ : विषयनिहाय आशयज्ञान आणि सामान्यज्ञान, इंग्रजी विषयाचे आशयज्ञान

अ) मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, भूगोल, इतिहास माध्यमिक स्तरापर्यंत विषयांचे ज्ञान

ब) चालू घडामोडी विशेषत: शैक्षणिक बाबी

क) क्रीडा विषयक घडामोडी."

२. केंद्र प्रमुखांची रिक्त पदे भरण्याकरिता सरळसेवा व मर्यादित विभागीय परीक्षा उपरोक्त अभ्यासक्रमानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाने निवड केलेल्या यंत्रणेमार्फत घेण्यात यावी. याबाबत रिक्त पदांचा बिंदूनामावलीनुसार तपशिल शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, यांनी आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे यांना उपलब्ध करुन द्यावा. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद माहिती तंत्रज्ञान विभागाने निवड केलेल्या यंत्रणेमार्फत सदर परीक्षेचे आयोजन करील. केंद्र प्रमुखांची सदर पदे भरण्याबाबतची उर्वरित कार्यपध्दती संदर्भाधीन क्रमांक ४ च्या शासन निर्णयानुसार विहित केल्याप्रमाणे असेल.

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९०९१५४०२८८०२१ असा आहे. हे शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Yashwantrao Kapadnis

Digitally signed by Swapnil Yashwantrao Kapadnis
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d4a2777935572a300d248b2271dd1361e9dac a04be6c6776fa9545e2476799d, cn=Swapnil Yashwantrao Kapadnis
Date: 2019.09.09 15:47:36 +05'30'

(स्वप्निल कापडणीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व)
५. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६. मा. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य विधानभावन, मुंबई/नागपूर
७. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
८. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
९. प्रधान सचिव/सचिव(सर्व), मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१८. निवड नस्ती टीएनटी-१.